जाहिरात क्रमांक दि. - पुणे, **Advt.**

# जाहिरात

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
## रिक्त पदे सन २०११ व २०१२ साठी भरती प्रक्रिया

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आस्थापनेवरील तसेच विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन) पुणे / मुंबई / कोकण / नाशिक / कोल्हापूर / अमरावती / नागपूर / औरंगाबाद / लातूर आणि विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) पुणे / मुंबई / नाशिक / अमरावती / नागपूर / औरंगाबाद यांचे विभागीय आस्थापनेवरील खालील नमूद वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील रिक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून (लेखी/मौखिक) स्पर्धा परीक्षेसाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या., पुणे {Maharashtra Knowledge Corporation Ltd. (MKCL), Pune} यांच्यामार्फत अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.

अधिक माहिती **http://oasis.mkcl.org/sahakar2011** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदरचे संकेतस्थळ हे **दिनांक २६/१२/२०११ पासून कार्यरत होईल.**

**टिप :- मा. विभागीय आयुक्त यांचेकडील अतिरिक्त संवर्ग कक्षाकडून पात्र कर्मचारी उपलब्धतेच्या व नाहरकत प्रमाणपत्राच्या अधीन राहून रिक्तपदांच्या संख्येत वाढ / घट होण्याची शक्यता आहे. या व अन्य कोणत्याही कारणास्तव पदे कमी झाल्यास निवड केलेल्या उमेदवारांस नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही.**

### अ) प्रशासन विभाग

**१. निम्नश्रेणी लघुलेखक (वेतनबँड पीबी-२ रु. ९३००-३४८००+ग्रेडवेतन रु. ४३००)**

| अ. क्र. | विभागाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज . (ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | पुणे | २ | - | १ इतर | - | - | - | - | - | - | १ इतर |
| २ | कोल्हापूर | २ | १ महिला | १ इतर | - | - | - | - | - | - | - |
| ३ | औरंगाबाद | १ | १ इतर | - | - | - | - | - | - | - | - |
| ४ | लातुर | १ | १ इतर | - | - | - | - | - | - | - | - |

**२. लघुटंकलेखक (वेतनबँड पीबी-२ रु. ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु. २४००)**

| अ. क्र. | विभागाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज .(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | कोल्हापूर | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ इतर |
| २ | नाशिक | १ | १ इतर | - | - | - | - | - | - | - | - |
| ३ | मुख्यालय | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ इतर |
| ४ | अमरावती | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ इतर |

## ३. सहकारी अधिकारी(श्रेणी-१)(वेतनबँड पीबी-२रु.९३००-३४८००+ग्रेडवेतन रु.४३००)

| अ. क्र. | विभागाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | पुणे | २ | - | - | १ इतर | - | - | - | - | - | १ इतर |
| | | | १ पद कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb), | | | | | | | | |
| २ | कोल्हापूर | २ | - | - | - | - | - | - | - | - | २<br>१ इतर<br>१ महिला |
| | | | १ पद अपंग क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind) | | | | | | | | |
| ३ | अमरावती | २ | १ माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | १ इतर |
| | | | १ पद अपंग क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind) | | | | | | | | |
| ४ | नागपुर | २ | - | - | - | - | - | - | - | १ इतर | १ इतर |
| | | | १ पद अपंग क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind) | | | | | | | | |
| ५ | औरंगाबाद | २ | - | १ इतर | - | - | - | - | - | - | १ इतर |
| | | | १ पद अपंग क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind) | | | | | | | | |
| ६ | लातुर | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ इतर |
| | | | १ पद अपंग क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind) | | | | | | | | |

## ४. सहकारी अधिकारी(श्रेणी-२)(वेतनबँड पीबी-२ रु.९३००-३४८००+ग्रेडवेतनरु.४२००)

| अ. क्र. | विभागाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | पुणे | २ | - | - | - | - | - | - | - | - | २ इतर |
| | | | १ अपंग कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb), | | | | | | | | |
| २ | मुंबई | २ | - | - | - | - | १ इतर | - | - | - | १ माजी सैनिक |
| | | | १ अपंग क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind) | | | | | | | | |
| ३ | कोकण | ३ | - | - | - | १ माजी सैनिक | - | - | - | १ इतर | १ महिला |
| | | | १ अपंग कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb), | | | | | | | | |
| ४ | नाशिक | ७ | - | - | - | - | - | - | १ इतर | ३<br>१ महिला<br>२ इतर | ३<br>१ माजी सैनिक<br>१ अंशकालीन<br>१ इतर |
| | | | १ अपंग कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb), | | | | | | | | |
| ५ | कोल्हापूर | ६ | २<br>१ महिला<br>१ इतर | - | - | - | १ इतर | - | - | १ माजी सैनिक | २<br>१ प्रकल्पग्रस्त<br>१ खेळाडू |
| | | | १ अपंगकर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb), | | | | | | | | |
| ६ | अमरावती | ६ | १ महिला | - | १ अशंकालीन | - | १ इतर | - | - | | ३<br>१ माजी सैनिक<br>२ इतर |
| | | | १ पद अपंग क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind) | | | | | | | | |
| ७ | नागपुर | ६ | - | १ इतर | - | - | - | - | - | २<br>१ महिला<br>१ अशंकालीन | ३<br>१ माजी सैनिक<br>१ इतर<br>१ महिला |
| | | | १ अपंग कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb) | | | | | | | | |
| ८ | औरंगाबाद | ५ | १ महिला | - | - | - | - | - | - | १ इतर | ३<br>१ माजी सैनिक<br>२ इतर |
| | | | १ पद अपंग क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind) | | | | | | | | |
| ९ | लातुर | १ | १ महिला | - | - | - | - | - | - | - | - |

## ५. सहाय्यक सहकारी अधिकारी/वरिष्ठ लिपिक (वेतनबँड पीबी-१रु.५२००- २०२००+ग्रेडवेतन रु. २४००)

| अ. क्र. | विभागाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज . (क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | पुणे | ४ | - | - | - | - | - | - | - | २ इतर | २<br>१ महिला<br>१ इतर |
| | | | १ अपंग- **अस्थिव्यंग (Ortho , Ortho Locomotive, cerebral palsy)** | | | | | | | | |
| २ | मुंबई | २ | - | १ इतर | - | - | - | - | - | | १ माजी सैनिक |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| ३ | कोकण | ४ | १ महिला | १ माजी सैनिक | - | - | - | - | - | १ अंशकालीन | १ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| ४ | नाशिक | १० | १ माजी सैनिक | - | - | १ इतर | १ इतर | - | - | २<br>१ माजी सैनिक<br>१ अंशकालीन | ५<br>१ खेळाडू<br>१ अंशकालीन<br>१ माजी सैनिक<br>२ इतर |
| | | | १ अपंग-**अस्थिव्यंग (Ortho , Ortho Locomotive, cerebral palsy)** | | | | | | | | |
| ५ | कोल्हापूर | १ | १ महिला | - | - | - | - | - | - | - | - |
| ६ | मुख्यालय | ११ | १ इतर | २<br>१ महिला<br>१ इतर | १ इतर | १ इतर | - | - | १ इतर | ४<br>१ माजी सैनिक<br>१ अंशकालीन<br>१ महिला<br>१ इतर | १ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| ७ | अमरावती | ३ | १ महिला | १ माजी सैनिक | - | - | - | - | - | - | १ इतर |
| | | | १ अपंग **कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb)** | | | | | | | | |
| ८ | नागपुर | ५ | १ महिला | - | - | - | - | - | १महिला | १ माजी सैनिक | २<br>१ इतर<br>१<br>अशंकालीन |
| | | | १ अपंग- **अस्थिव्यंग (Ortho , Ortho Locomotive, cerebral palsy)** | | | | | | | | |
| ९ | औरंगाबाद | ७ | - | १ इतर | - | १ माजी सैनिक | १ इतर | - | - | - | ४<br>१ महिला<br>१ अशंकालीन<br>२ इतर |
| १० | लातुर | ६ | - | - | - | - | - | - | - | २<br>१ माजी सैनिक<br>१ इतर | ४<br>१ माजी सैनिक<br>१ इतर<br>१ खेळाडु<br>१ अशंकालीन |

## ६. लिपिक-टंकलेखक (वेतनबँड पीबी-१ रु. ५२००- २०२००+ग्रेडवेतन रु. १९००)

| अ. क्र. | विभागाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि. जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | पुणे | ४९ | **६**<br>२ माजी सैनिक<br>१ महिला<br>१ खेळाडू<br>१ इतर<br>१ अंशकालीन | **५**<br>१ माजी सैनिक<br>१ महिला<br>३ इतर | - | - | - | - | १ इतर | **१४**<br>५महिला<br>२ माजी सैनिक<br>१ खेळाडू<br>५ इतर<br>१ अंशकालीन | **२३**<br>५ माजी सैनिक<br>३ महिला<br>१ खेळाडू<br>१ प्रकल्पग्रस्त<br>९ इतर<br>४ अंशकालीन |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| २ | कोकण | २४ | **३**<br>१ महिला<br>१ माजी सैनिक<br>१ अंशकालीन | १ महिला | - | - | **२**<br>१ महिला<br>१ अंशकालीन | १ महिला | - | **९**<br>२ महिला<br>१ माजी सैनिक<br>१ प्रकल्पग्रस्त<br>१ भुकंपग्रस्त<br>१ अंशकालीन<br>३ इतर | **८**<br>३ महिला<br>२ माजी सैनिक<br>१ खेळाडू<br>२ इतर |
| | | | २ अपंग- १ **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** व १ **कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb)** | | | | | | | | |
| ३ | नाशिक | ५१ | **५**<br>१ माजी सैनिक<br>१ भुकंपग्रस्त<br>१ खेळाडू<br>१ अंशकालीन<br>१ इतर | २ इतर | **२**<br>१ माजी सैनिक<br>१ इतर | २ इतर | **२**<br>१ माजी सैनिक<br>१ इतर | १ इतर | १ इतर | **११**<br>२ माजी सैनिक<br>१ भुकंपग्रस्त<br>२ महिला<br>१ खेळाडू<br>२ अंशकालीन<br>३ इतर | **२५**<br>७ माजी सैनिक<br>१ भुकंपग्रस्त<br>३ महिला<br>७ अंशकालीन<br>७ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| ४ | कोल्हापूर | ९ | - | १ माजी सैनिक | १ महिला | - | - | १ अंशकालीन | - | **४**<br>२ माजी सैनिक<br>१ महिला<br>१ अंशकालीन | **२**<br>१ खेळाडू<br>१ इतर |
| ५ | मुख्यालय | १७ | **२**<br>१ माजी सैनिक<br>१ अंशकालीन | **३**<br>१ माजी सैनिक<br>१ महिला<br>१ इतर | - | १ महिला | - | - | १ इतर | **२**<br>१ माजी सैनिक<br>१ अंशकालीन | **८**<br>१ माजी सैनिक<br>१ प्रकल्पग्रस्त<br>२ महिला<br>२ अंशकालीन<br>१ खेळाडू<br>१ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )अंध (Blind)** | | | | | | | | |
| ६ | अमरावती | २२ | **३**<br>१ महिला<br>१ माजी सैनिक<br>१ इतर | - | १ प्रकल्पग्रस्त | १ इतर | - | १ इतर | १ माजी सैनिक | **४**<br>१ महिला<br>१ माजी सैनिक<br>१ अशंकालीन<br>१ इतर | **११**<br>३ महिला<br>४ माजी सैनिक<br>१ अशंकालीन<br>१ खेळाडु<br>२ इतर |
| | | | १ अपंग- **अस्थिव्यंग (Ortho , Ortho Locomotive, cerebral palsy)** | | | | | | | | |
| ७ | नागपुर | ३० | **४**<br>१ अशं कालीन<br>१ माजी सैनिक<br>१ प्रकल्पग्रस्त<br>१ महिला | १महिला | **२**<br>१ महिला<br>१ इतर | **२**<br>१ महिला<br>१ इतर | **२**<br>१महिला<br>१ इतर | १ इतर | १ महिला | **५**<br>२ माजी सैनिक<br>१ महिला<br>२ अशं कालीन | **१२**<br>२ माजी सैनिक<br>२ महिला<br>२ खेळाडु<br>६ इतर |
| | | | २ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/ अंध (Blind), २ अपंग कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb) व २-**अपंग **अस्थिव्यंग (Ortho , Ortho Locomotive, cerebral palsy)** | | | | | | | | |
| ८ | औरंगाबाद | २० | १ भुकंपग्रस्त | १ माजी सैनिक | - | - | १ माजी सैनिक | - | - | **५**<br>१महिला<br>१ अशंकालीन<br>२ माजी सैनिक<br>१ इतर | **१२**<br>७ इतर<br>३ माजी सैनिक<br>१ खेळाडु<br>१ अशंकालीन |
| | | | १ अपंग- **अस्थिव्यंग (Ortho , Ortho Locomotive, cerebral palsy)** | | | | | | | | |
| ९ | लातुर | २९ | **२**<br>१ माजी सैनिक<br>१ इतर | **२**<br>१महिला<br>१ इतर | - | १ इतर | २ इतर | १ इतर | १ इतर | **११**<br>२ माजी सैनिक<br>४महिला<br>३ इतर<br>२ अशं कालीन | **९**<br>१ माजी सैनिक<br>३ महिला<br>३ इतर<br>१ अशंकालीन<br>१ खेळाडु |

## ७. वाहनचालक (वेतनबँड पीबी-१ रु. ५२००- २०२००+ग्रेडवेतन रु. १९००)

| अ. क्र. | विभागाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | कोकण | २ | - | १ इतर | - | - | - | - | - | - | १ माजी सैनिक |
| २ | नाशिक | ३ | - | १ इतर | - | - | - | - | - | १ इतर | १ इतर |

## ८. शिपाई (वेतनबँड पीबी-एस रु.४४४०- ७४४०+ग्रेडवेतन रु. १३००)

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | पुणे | २३ | **५**<br>१ माजी सैनिक<br>१ महिला<br>३ इतर | १ इतर | १ इतर | - | १<br>इतर | १ इतर | १ इतर | **६**<br>१ माजी सैनिक<br>५ इतर | **७**<br>१ माजी सैनिक<br>४ महिला<br>२ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** व १ **कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb)** | | | | | | | | |
| २ | सोलापूर | १२ | - | १ महिला | - | १ इतर | - | १ इतर | १ इतर | **३**<br>१ माजी सैनिक<br>१महिला<br>१ इतर | **५**<br>१ माजी सैनिक<br>१ महिला<br>३ इतर |
| | | | १ अपंग- **अस्थिव्यंग (Ortho , Ortho Locomotive, cerebral palsy)** | | | | | | | | |
| ३ | मुख्यालय, पुणे | ९ | **४**<br>१ माजी सैनिक<br>१ अंशकालीन<br>१ महिला<br>१ इतर | - | - | - | १<br>इतर | - | - | **२**<br>१ अंशकालीन<br>१ खेळाडू | २ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** व १ **कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb)** | | | | | | | | |
| ४ | अमरावती | ८ | १ इतर | - | - | १ इतर | - | - | - | २<br>१ महिला<br>१ इतर | **४**<br>१ महिला<br>१ माजी सैनिक<br>१ अंशकालीन<br>१ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| ५ | अकोला | ४ | - | - | १ महिला | - | - | - | - | १ माजी सैनिक | **२**<br>१ अंशकालीन<br>१ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| ६ | वाशिम | ४ | - | - | १ अंशकालीन | | | | | | **३**<br>१ माजी सैनिक<br>१ महिला<br>१ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| ७ | बुलडाणा | ८ | - | - | - | - | - | - | - | **३**<br>१ महिला<br>२ इतर | **५**<br>१ महिला<br>१ माजी सैनिक<br>१ अंशकालीन<br>२ इतर |
| ८ | यवतमाळ | ११ | **२**<br>१ महिला<br>१ इतर | १ इतर | - | - | - | - | १ इतर | **२**<br>१ महिला<br>१ अंशकालीन | **५**<br>२ माजी सैनिक<br>१ महिला<br>१ खेळाडू<br>१ इतर |
| | | | १ अपंग **कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb)** | | | | | | | | |
| ९ | नागपूर | १३ | **४**<br>१ माजी सैनिक<br>१ महिला<br>१ भूकंपग्रस्त<br>१ प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | १ महिला | १<br>महिला | **२**<br>१ महिला<br>१ इतर | **५**<br>१ माजी सैनिक<br>१ खेळाडू<br>१ अंशकालीन<br>२ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** व १ अपंग **कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb)** | | | | | | | | |
| १० | वर्धा | ३ | - | - | - | - | - | - | - | १ इतर | **२**<br>१ महिला<br>१ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |

| अ. क्र. | जिल्ह्याचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| ११ | चंद्रपूर | ३ | - | - | - | - | - | - | - | - | ३<br>१ महिला<br>२ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| १२ | भंडारा | १ | - | - | - | - | - | - | - | १ इतर | - |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| १३ | गोंदिया | २ | - | - | - | - | - | - | - | १ इतर | १ महिला |
| १४ | गडचिरोली | ३ | - | १ महिला | १ इतर | - | - | - | - | - | १ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| १५ | औरंगाबाद | ३ | - | - | १ इतर | - | - | - | १ इतर | १ माजी सैनिक | - |
| १६ | परभणी | ६ | २<br>१ माजी सैनिक<br>१ महिला | - | - | - | - | - | - | २<br>१ महिला<br>१ इतर | २ इतर |
| | | | १ अपंग **कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb)** | | | | | | | | |
| १७ | हिंगोली | २ | १ इतर | - | - | - | - | - | - | १ महिला | - |
| | | | १ अपंग- **अस्थिव्यंग (Ortho , Ortho Locomotive, cerebral palsy)** | | | | | | | | |
| १८ | उस्मानाबाद | ५ | १ महिला | - | - | - | १ इतर | - | - | २<br>१ माजी सैनिक<br>१ महिला | १ महिला |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| १९ | बीड | ५ | २<br>१ महिला<br>१ इतर | - | - | - | - | - | - | - | ३<br>१ महिला<br>२ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| २० | नांदेड | ५ | - | - | - | - | - | १ इतर | १ इतर | २ महिला | १ महिला |
| २१ | लातूर | ५ | १ महिला | - | - | - | - | - | - | १ माजी सैनिक | ३<br>१ माजी सैनिक<br>२ महिला |

**संक्षिप्त नोंदींचे पूर्ण स्वरुप -**

**क्षीणदृष्टी (Lower Vision ), अंध (Blind)**
**कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb),**
**अस्थिव्यंग (Ortho , Ortho Locomotive, cerebral palsy)**

**शैक्षणिक अर्हता :** खालील पदांकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता उमेदवारांनी जाहिरातीचे दिनांकास धारण केलेली असणे आवश्यक आहे.

**पद क्रमांक १ - निम्नश्रेणी लघुलेखक -**

१. संविधानिक माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक अथ्वा अन्य तत्सम शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.
२. मराठी किंवा इंग्रजी लघुलेखनाचा वेग प्रति मिनिट किमान १०० शब्द आणि मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिट किंवा इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रति मिनिट असणे आवश्यक. (लघुलेखन व टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आवश्यक)

**पद क्रमांक २ - लघु टंकलेखक**

१. संविधानिक माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक अथ्वा अन्य तत्सम शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

२. मराठी किंवा इंग्रजी लघुलेखनाचा वेग प्रति मिनिट किमान ८० शब्द आणि मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिट किंवा इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रति मिनिट असणे आवश्यक. (लघुलेखन व टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आवश्यक)

निम्नश्रेणी लघुलेखक व लघु टंकलेखक या पदासाठी व्यवसायीक चाचणी घेणे आवश्यक राहील.अशा पदासाठी १०० गुणाची लेखी परिक्षा, ८० गुणांची व्यावसायीक चाचणी व मुलाखतीसाठी २० गुण ठेवुन उमेदवारांची निवड करुन गुणवत्ता प्राप्त उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.जे उमेदवार लेखी परिक्षेत उत्तीर्ण होतील अशांनाच व्यावसायीक चाचणी देता येईल. वस्तुनिष्ठ परिक्षा सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १९-१०-०७ मध्ये विहीत केल्याप्रमाणे राहील.

**पद क्रमांक ३ - सहकारी अधिकारी(श्रेणी-१) -**

मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला(अर्थशास्त्रासह)/वाणिज्य/विज्ञान/विधी/कृषी शाखेतील **पदवी** किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक.

**पद क्रमांक ४ - सहकारी अधिकारी(श्रेणी-२) -**

मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला(अर्थशास्त्रासह)/वाणिज्य/विज्ञान/विधी/कृषी शाखेतील **पदवी** उत्तीर्ण असणे आवश्यक.

**पद क्रमांक ५ - सहाय्यक सहकारी अधिकारी/वरिष्ठ लिपिक -**

मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला/वाणिज्य/विज्ञान/विधी/कृषी शाखेतील **पदवी** उत्तीर्ण असणे आवश्यक.

## प्रशिक्षण व अनुभव :- पद क्र. ३,४ व ५ करिता

सहकार क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव असल्यास अथवा सहकारातील जनरल बेसिक कोर्सचे प्रशिक्षण पूर्ण केले असल्यास अथवा जी.डी.सी.ॲड ए.परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य.

**पद क्रमांक ६ - लिपिक - टंकलेखक -**

१) सांविधानिक माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) वा तत्सम मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

२) टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा इंग्रजी टंकलेखन ४० शब्द प्रती मिनिट आणि मराठी टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

**पद क्रमांक ७ - वाहनचालक -**

इयत्ता ४ थी उत्तीर्ण आवश्यक. मोटार कार / जीप / जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक. मराठी व हिंदी भाषा बोलता आली पाहिजे. ३ वर्षाचा वाहन चालविण्याचा अनुभव आवश्यक. मोटार मेॅकनिझम व संबंधित प्रादेशिक विभागाच्या भौगोलिक परिस्थितीचे ज्ञान असणे आवश्यक.

**पद क्रमांक ८ - शिपाई**

उमेदवार हा किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण असावा.

## ब) लेखापरिक्षण विभाग

### १. लेखापरिक्षक (श्रेणी-१)(वेतनबँड पीबी-२रु.९३००-३४८००+ग्रेडवेतन रु.४३००)

| अ. क्र. | विभागाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | पुणे | २ | - | १ इतर | - | - | - | - | १ इतर | - | - |
| २ | मुंबई | २ | - | - | - | - | - | - | - | १ इतर | १ इतर |
| ३ | नाशिक | ४ | - | - | - | - | - | - | १ इतर | - | **३**<br>१ माजी सैनिक<br>१ खेळाडू<br>१ इतर |
| ४ | अमरावती | १ | - | १ महिला | - | - | - | - | - | - | - |
| ५ | नागपुर | २ | - | - | - | - | - | - | १ इतर | - | १ महिला |

## **२. लेखापरिक्षक (श्रेणी-२)(वेतनबँड पीबी-२ रु.९३००-३४८००+ग्रेडवेतनरु.४२००)**

| अ. क्र. | विभागाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | पुणे | २ | - | १ महिला | - | - | - | - | - | - | १ माजी सैनिक |
| २ | मुंबई | ५ | - | - | - | - | १ इतर | - | - | - | **४**<br>२ माजी सैनिक<br>१ खेळाडू<br>१ इतर |
| ३ | नाशिक | ९ | **२**<br>१ माजी सैनिक<br>१ महिला | १ महिला | - | - | - | - | - | १ मा.सै. | **५**<br>२ माजी सैनिक<br>१ महिला<br>१ अंशकालीन<br>१ इतर |
| ४ | अमरावती | ६ | १ इतर | १ इतर | - | - | १ इतर | - | - | १ इतर | **२**<br>१ इतर<br>१ अशंकालीन |
| | | | १ अपंग **कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb)** | | | | | | | | |
| ५ | औरंगाबाद | ६ | १ माजी सैनिक | १ महिला | - | - | - | - | - | - | **४**<br>१ माजी सैनिक<br>३ महिला |
| ६ | नागपुर | २ | - | - | - | - | - | - | - | १ महिला | १ इतर |
| | | | १ अपंग **कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb)** | | | | | | | | |

## **३. उपलेखापरिक्षक / वरिष्ठ लिपिक (वेतनबँड पीबी-१ रु.५२००- २०२००+ग्रेडवेतन रु. २४००)**

| अ. क्र. | विभागाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | पुणे | ४ | **२**<br>१ महिला<br>१ खेळाडू | - | १ महिला | - | १ महिला | - | - | - | - |
| २ | मुंबई | ११ | १ इतर | २ इतर | - | - | - | १ महिला | - | **४**<br>१ महिला<br>३ इतर | **३**<br>१ माजी सैनिक<br>२ इतर |
| ३ | नाशिक | १० | **२**<br>१ माजी सैनिक<br>१ महिला | - | - | - | - | १ इतर | १ इतर | १ माजी सैनिक | **५**<br>२ माजी सैनिक<br>२ महिला<br>१ अंशकालीन |
| | | | १ अपंग **कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb)** | | | | | | | | |
| ४ | अमरावती | ४ | १ इतर<br>१ महिला | - | - | - | - | - | - | १ महिला | १ इतर |
| | | | १ अपंग- **अस्थिव्यंग (Ortho , Ortho Locomotive, cerebral palsy)** | | | | | | | | |
| ५ | औरंगाबाद | १७ | **२**<br>१ महिला<br>१ माजी सैनिक | **२**<br>१ माजी सैनिक<br>१ इतर | - | १ इतर | - | - | १ इतर | **५**<br>२ महिला<br>१ माजी सैनिक<br>२ इतर | **६**<br>३ महिला<br>२ माजी सैनिक<br>१ इतर |
| | | | १ अपंग **क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind)** | | | | | | | | |
| ५ | नागपुर | ६ | - | - | १ इतर | १ इतर | १ महिला | - | - | **२**<br>१ इतर<br>१ माजी सैनिक | १ माजी सैनिक |

**४. कनिष्ठ लिपिक (वेतनबँड पीबी-१ रु. ५२००- २०२००+ग्रेडवेतन रु. १९००)**

| अ. क्र. | विभागाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | पुणे | २० | ५<br>३ महिला<br>२ इतर | १ महिला | १ महिला | - | १ महिला | - | - | १ खेळाडू | ११<br>४ महिला<br>३ खेळाडू<br>४ इतर |
| २ | मुंबई | १५ | १ इतर | २<br>१ माजी सैनिक<br>१ इतर | २<br>१ महिला<br>१ इतर | १ खेळाडू | २<br>१ माजी सैनिक<br>१ इतर | - | - | १ माजी सैनिक | ६<br>३ माजी सैनिक<br>३ इतर |
| | | | १ अपंग क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind) | | | | | | | | |
| ३ | नाशिक | ४१ | ७<br>३ माजी सैनिक<br>१ प्रकल्पग्रस्त<br>१ महिला<br>१ खेळाडू<br>१ अंशकालीन | ४<br>१ माजी सैनिक<br>१ महिला<br>१ खेळाडू<br>१ अंशकालीन | - | १ माजी सैनिक | ३<br>१ माजी सैनिक<br>२ इतर | १ माजी सैनिक | २ इतर | १०<br>३ माजी सैनिक<br>१ प्रकल्पग्रस्त<br>४ महिला<br>१ खेळाडू<br>१ अंशकालीन | १३<br>२ माजी सैनिक<br>१ प्रकल्पग्रस्त<br>४ महिला<br>१ खेळाडू<br>१ अंशकालीन<br>४ इतर |
| ४ | अमरावती | ६ | १ माजी सैनिक | २ इतर | - | - | - | - | - | २<br>१ महिला<br>१ इतर | १ माजी सैनिक |
| ५ | औरंगाबाद | ३४ | ३<br>१ महिला<br>१ माजी सैनिक<br>१ खेळाडु | ३<br>१ माजी सैनिक<br>१ अशं कालीन<br>१ इतर | - | १ इतर | १ माजी सैनिक | - | २<br>१ महिला<br>१ इतर | ८<br>२ महिला<br>३ माजी सैनिक<br>१ अशं कालीन<br>१ खेळाडु<br>१ इतर | १६<br>१० महिला<br>४ माजी सैनिक<br>१ इतर<br>१ खेळाडु |
| | | | १ अपंग कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb) | | | | | | | | |
| ६ | नागपुर | २२ | २<br>१ इतर<br>१ महिला | २<br>१ इतर<br>१ महिला | १ इतर | - | २<br>१ इतर<br>१ खेळाडु | - | २<br>१ इतर<br>१ महिला | ४<br>२ इतर<br>२ माजी सैनिक | ९<br>४ माजी सैनिक<br>२ अशंकालीन<br>३ इतर |

**५. शिपाई (वेतनबँड पीबी-एस रु.४४४०- ७४४०+ग्रेडवेतन रु. १३००)**

| अ. क्र. | विभागाचे नांव | एकूण रिक्त पदांची संख्या | सामाजिक आरक्षण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
| १ | पुणे | १९ | - | - | - | - | १ माजी सैनिक | १ इतर | - | ७<br>३ माजी सैनिक<br>३ महिला<br>१ खेळाडू | १०<br>४ माजी सैनिक<br>१ प्रकल्पग्रस्त<br>५ महिला |
| २ | मुंबई | ८ | - | - | - | - | १ इतर | १ इतर | - | ६ इतर | - |
| ३ | नाशिक | ९ | - | - | - | - | - | - | - | ३<br>१ माजी सैनिक<br>१ महिला<br>१ इतर | ६<br>१ माजी सैनिक<br>२ महिला<br>१ अंशकालीन<br>२ इतर |
| | | | १ अपंग क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind) | | | | | | | | |
| ४ | औरंगाबाद | ८ | १ माजी सैनिक | - | - | - | - | - | - | १ माजी सैनिक | ६<br>४ माजी सैनिक<br>२ इतर |
| | | | १ अपंग कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb) व १ अपंग क्षीणदृष्टी (Lower Vision )/अंध (Blind) | | | | | | | | |

**संक्षिप्त नोंदींचे पूर्ण स्वरुप -**

**क्षीणदृष्टी (Lower Vision ), अंध (Blind)**
**कर्णबधीर व मूकबधीर (Deaf and Dumb),**
**अस्थिव्यंग (Ortho , Ortho Locomotive, cerebral palsy)**

**१. शैक्षणिक अर्हता :** खालील पदांकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता उमेदवारांनी जाहिरातीचे दिनांकास धारण केलेली असणे आवश्यक आहे.

**पद क्रमांक १ - लेखापरिक्षक (श्रेणी-१) -**

मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेकडील ॲडव्हान्स अकौंटन्सी व ऑडिटिंग या विषयासह बी.कॉम **पदवी** किमान द्वितीय श्रेणीत धारण केलेली असणे आवश्यक.

टिप - मुंबई विद्यापीठाची फायनान्शिअल अकौंटन्सी व ऑडिटिंग या विषयासह वाणिज्य शाखेची द्वितीय श्रेणीतील बी.कॉम पदवी ही समतुल्य अर्हता म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

**पद क्रमांक २ - लेखापरिक्षक (श्रेणी-२) -**

मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेकडील ॲडव्हान्स अकौंटन्सी व ऑडिटिंग या विषयासह बी.कॉम **पदवी** किमान द्वितीय श्रेणीत धारण केलेली असणे आवश्यक.

टिप - मुंबई विद्यापीठाची फायनान्शिअल अकौंटन्सी व ऑडिटिंग या विषयासह वाणिज्य शाखेची द्वितीय श्रेणीतील बी.कॉम पदवी ही समतुल्य अर्हता म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

**पद क्रमांक ३ - उपलेखापरिक्षक -**

मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेकडील ॲडव्हान्स अकौंटन्सी व ऑडिटिंग या विषयासह बी.कॉम **पदवी** धारण केलेली असणे आवश्यक.

टिप : मुंबई विद्यापीठाची फायनान्शिअल अकौंटन्सी व ऑडिटिंग या विषयासह वाणिज्य शाखेची बी.कॉम पदवी ही समतुल्य अर्हता म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

## प्रशिक्षण व अनुभव :- पद क्र. १,२, व ३ करिता

१ . ज्यांनी वरील शैक्षणिक अर्हता संपादन केल्यानंतर एखाद्या शासकीय खात्यातील अथवा शासनाने स्थापित केलेल्या उपक्रमामधील / संस्थांमधील जबाबदारीच्या पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य राहिल.

२. सहकार क्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव असल्यास अथवा सहकारातील जनरल बेसिक कोर्सचे प्रशिक्षण पूर्ण केले असल्यास अथवा जी.डी.सी. ॲन्ड ए. परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य राहिल.

**विशेष सूचना :**

लेखा परिक्षक श्रेणी १,लेखा परिक्षक श्रेणी २ व उपलेखा परिक्षक या पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी वाणिज्य शाखेतील पदवी धारण करतांना ॲडव्हान्स अकौटंन्सी व ऑडीटींग या विषयासह पदवी धारण केली आहे. किंवा कसे याची उमेदवारांने स्वतः खात्री करावी व नंतरच सदर पदासाठी अर्ज करावा.ज्या उमेदवारांनी ॲडव्हान्स अकौटंन्सी व ऑडीटींग या विषयासह पदवी धारण केली नाही अशी शंका उपस्थित झाल्यास सबंधीत विद्यापिठाशी पत्रव्यवहार करुन नंतरच अशा उमेदवारांचा नियुक्तीबाबत निर्णय घेण्यात येईल. विद्यापीठाकडुन प्रतिकुल स्वरुपाचा अहवाल आल्यास सबंधीत उमेदवारांचा नियुक्तीच्या अनुषंगाने कोणताही हक्क राहणार नाही.

**पद क्रमांक ४ - कनिष्ठ लिपिक -**

१) सांविधानिक माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) वा तत्सम मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

२) टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा इंग्रजी टंकलेख्रन ४० शब्द प्रती मिनिट आणि मराठी टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. इंग्रजी व मराठी दोन्ही टंकलेखन असल्यास निवडीस प्राधान्य देण्यात येईल.

**पद क्रमांक ५ - शिपाई**

उमेदवार हा किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण असावा.

## २. वयोमर्यादा - (जाहिरातीचे दिनांकास)

१. उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास १८ वर्षांपेक्षा कमी व ३३ वर्षांपेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

२. अपंग उमेदवारांसाठी जाहिरातीचे दिनांकास उच्चतम वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षे राहील.

३. सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २७.१०.२००९ च्या शासन निर्णयानुसार सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत ३ वर्षे अंशकालीन काम केलेल्या उमेदवारांना उच्चतम वयोमर्यादा ४६ वर्षे राहिल.

४. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दि. १०.१०.८० , १६/०४/१९८१ व दि.५.१०.८९ नुसार वयातील सूट या मुद्यात नमूद तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन विभाग शुद्धिपत्रक क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ दि.२०/०८/२०१० नुसार माजी सैनिकांची ६ महिन्यांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीची सेवा केंद्र

शासनाच्या सशस्त्र दलात व्हावयास हवी अशा सैनिकांच्या बाबतीत त्यांच्या सशस्त्र दलात झालेल्या सलग सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी विहित वयोमर्यादेत सूट देण्यात येईल आणि विकलांग (disabled) माजी सैनिकांचे बाबतीत वयोमर्यादेत ४५ वर्षापर्यंत सूट देण्यात येईल.

५. खेळाडूंसाठी खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या उच्चतम वयोमर्यादेत ५ वर्षांपर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल.

६. दिनांक ३/२/२००७ चे शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहिल.

**विशेष सूचना :**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशासन-२०००/प्र.क्र.५/२००१/३२ दिनांक २०.०७.२००२ व आनुषंगिक सुधारित शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे खाली नमूद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षांच्या आंत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त होईल.

१. D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा ,

२) महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

**अपंग पदांसाठी** - १) अपंग पदांसाठी निकष अपंग अधिनियम १९९५ मध्ये विहीत केल्याप्रमाणे आहेत, तसेच अपंग प्रवर्गासाठी सक्षम शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

२) दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी, डिस्लेक्सियाने बाधित झालेल्या व्यक्ती लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेसाठी लेखनिक पुरविणेबाबत व्यवस्था सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.न्यायाप्र-२०११/प्र.क्र.११/सुधार-३, दि.१७/०८/२०११ मध्ये नमुद तरतुदीनुसार राहतील.

**टीप - १. अपंगांसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत. अपंगांसाठी आरक्षित असलेल्या पदावर सरळसेवेने भरती करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्यांची भरती करण्यात यईल व भरती केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल, त्या उपलब्ध सामाजिक प्रवर्गात उमेदवारास सामावून घेण्यात येईल.**

**२. महाराष्ट्र शासन,महिला बाल विकास विभाग यांचे निर्णयातील तरतुदीनुसार ३० टक्के महिला आरक्षणासाठी सबंधीत प्रवर्गातील महिला उमेदवार न मिळाल्यास त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवारामधुन पदे भरण्यात येतील**

**३. सन २०१२ मध्ये काही विभागांत रिक्त होणाऱ्या पदांचाही समावेश उपरोक्त पदांमध्ये करण्यात आलेला आहे. या प्रक्रियेतील उमेदवारांना पद उलब्धतेनुसार निवड व नियुक्ती देण्यात येईल.**

**३ . सर्व पदांसाठी समान सूचना :**

१. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा.(वास्तव्याचे[डोमिसाईल] प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.).

शासन निर्णय म.क.सी/१००७/प्र.क्र.३६/का३४/दि.१०/०७/२००८ अन्वये महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना अर्ज करता येईल.(ते मराठी भाषिक असणे आवश्यक आहे तसेच सदर गांवात १५ वर्षे वास्तव्यास असलेबाबतचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला जोडणे अनिवार्य राहील.)

२. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र गुणवत्ता यादी संवर्ग व प्रवर्ग निहाय सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे व पुणे / मुंबई / कोकण/ नाशिक/कोल्हापूर/अमरावती/नागपूर/औरंगाबाद/लातूर प्रशासन विभाग आणि पुणे / मुंबई / नाशिक/अमरावती/नागपूर/औरंगाबाद लेखापरीक्षण विभागासाठी तयार करण्यात येईल.

३. उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने परीक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज MKCL च्या संबंधित अधिकृत प्रशिक्षण केंद्र (ALC - Authorised Learning Centre) वर उपलब्ध होतील. या अधिकृत ALC ची माहिती **http://oasis.mkcl.org/sahakar2011** या संकेतस्थळावर मिळेल.

४. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित अधिकृत ALC वर दि.२६/१२/२०११ पासून उपलब्ध राहतील. **सदर अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५/०१/२०१२ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंतच राहील.** ६ वाजेपर्यंत संबंधित केंद्रावर दाखल झालेले अर्ज भरुन घेतले जातील. उमेदवाराने MKCL च्या संबंधित अधिकृत प्रशिक्षण केंद्रामार्फत भरलेले अर्जच स्वीकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज अथवा अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी. उमेदवारांनी अर्ज या कार्यालयाकडे परस्पर दाखल करु नयेत.

५. उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर विहित ठिकाणी अलिकडील काळातील काढलेला एक पासपोर्ट साईज फोटो लावावा व फोटोखाली दर्शविलेल्या योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी.

६. पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व लेखी परीक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक,परीक्षेचा दिनांक,स्थळ इत्यादी बाबतची माहिती MKCL च्या संबंधित ALC वर उपलब्ध राहील. तसेच ही माहिती उपरोक्त नमूद संकेत स्थळावर (website) वर उपलब्ध राहील व याबाबत अलाहिदा "अ" दर्जाच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धिही देण्यात येईल.

७. **लघुलेखक (उच्चश्रेणी/निम्नश्रेणी), लघुटंकलेखक, सहकारी अधिकारी श्रेणी -१, सहकारी अधिकारी श्रेणी-२, सहाय्यक सहकारी अधिकारी / वरिष्ठ लिपिक , लेखापरिक्षक श्रेणी १, लेखापरिक्षक श्रेणी २, उपलेखापरिक्षक , कनिष्ठ लिपिक, वाहनचालक व शिपाई या प्रत्येक पदासाठी सर्वसाधारण (खुल्या प्रवर्गातील) उमेदवारांनी रुपये २००/- (रुपये दोनशे फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांनी रुपये १००/- (रुपये शंभर फक्त) परीक्षा शुल्क परिपूर्ण अर्जासोबत रोखीने भरावयाचे आहे.** परीक्षा शुल्क रोखीने स्वीकारण्याची सोय MKCL च्या अधिकृत ALC केंद्रांवर केलेली आहे. सदर परीक्षा शुल्क हे ना परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही. अर्जाची पोहोच व उमेदवाराने भरलेल्या अर्जाचा गोषवारा तक्ता (Summary Sheet) सदर अधिकृत केंद्राकडून दिली जाईल. उमेदवाराने सदर प्रत प्राप्त करुन घ्यावी व जतन करुन ठेवावी.

**माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही. मात्र त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पूर्ण केल्याचे कार्यमुक्त पत्राची साक्षांकित प्रत सोबत सादर करणे आवश्यक राहील.**

८. माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण बोर्डात नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

९. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नांवनोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रत उपलब्ध असल्यास अर्जासोबत जोडावी.

१०. अपंगांचे आरक्षण महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-२०११/प्र.क्र.१२९/सुधार-३, दिनांक ०४ ऑगस्ट, २०११ मधील तरतुदीनुसार राहील.

११. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव तसेच जातीचा दाखला, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, अंशकालीन प्रमाणपत्र व इतर अर्हताविषयक प्रमाणपत्रे इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे **(मूळ कागदपत्रे जोडू नयेत)**. सदर प्रती केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच साक्षांकित केलेल्या असाव्यात. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.

१२. अनुभवाच्या बाबतीत तासिका तत्वावर शिकाऊ उमेदवाराने अर्धवेळ, विनावेतन, अतिरिक्त कार्यभार प्रभारी पदावरील अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही.

१३. शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

१४. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २९ जानेवारी, २००४ पासून अंमलात आणला आहे. या अधिनियमातील नियम क्र. ४ (२)(दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता सर्व प्रवर्गांना लागू असेल अशी तरतूद केलेली आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग यांना लागू आहे. त्यानुसार या प्रवर्गातील उमेदवारांनी जात व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१५. महिलांचे आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र. ४१५/का-२, दिनांक २८/३/२००५ मधील तरतुदीनुसार राहील. त्यानुसार या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहीत उमेदवारांनी सुध्दा लागु नाही असे नमुद करुन सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.)

१६. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पअक-१००५/प्र.क्र. ३६/०५/१६-अ, दि. २८/३/२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१७. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक रक्रिधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रियोसे-२/दिनांक ३० एप्रिल, २००५ मधील तरतुदीनुसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक

खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील. खुल्या प्रवर्गामधील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण समाजातील उन्नत व प्रगत गटातील व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमिलेअर) खेळाडू सदस्यांना खेळाडूसाठी असलेले ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूंचे ५% आरक्षण लागू राहणार नाही.

**तसेच उत्कृष्ट खेळाडु उमेदवारासाठी सुचना**

अ). मा.महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग निर्णय क्रमांक रा.क्रा.धो-२००२/प्र.क्र.६८/क्री.यु.से.२/ दिनांक ३०-४-२००५, १८ नोव्हेबर २००६ व शासन निर्णय क्र.क्रि.असो१९०८/प्र.क्र.३९४/०८/क्रीयुये २ दिनांक २१-८-२००८ नुसार पात्र खेळाडु उमेदवार ब ). खेळाचा वैयक्तिक अथवर सांधिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अंजिक्यपद स्पर्धेत प्रथम द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण,रौप्य किंवा कास्यपद प्राप्त करणारा खेळाडु पात्र राहील. क ).राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये (एनसीसी)अंडर ऑफिसरची रॅंक मिळवुन राष्ट्रीय छात्र सेनेचा राष्ट्रीय स्पर्धात्मक पदके प्राप्त केलेली व्यक्ती पात्र राहील.ड). खेळाडु प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरीय खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे असावे वैयक्तिरित्या किंवा आंमत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडुचा विचार केला जाणार नाही. ई). किमान प्राविण्यपेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणा-या उमेदवारास प्राधान्य राहील.फ ) खुल्या प्रवर्गातील खेळाडु उमेदवारांनी उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

तसेच शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार अत्युच्च गुणवत्ताधारण खेळांडुसाठी आरक्षीत असलेल्या ५ % पदांच्या समांतर आरक्षणाच्या अनुषंगाने पात्र खेळाडु न मिळाल्यास त्याच प्रवर्गातील अन्य उमेदवारांमधुन पदे भरण्यात येतील.

१८. अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. तसे केल्याचे पुरावे अर्जासोबत जोडावेत.

१९. एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

२०. उपरोक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव किमान अर्हता व अनुभव दर्शवित आहे. तथापि उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभवाचे उमेदवार प्राप्त झाल्यास त्याचा अंतिम निवडीसाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल.

२१. पदांची उपलब्ध संख्या, सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परीक्षेत गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या व / किंवा समान गुण धारण करणाऱ्या त्या त्या संवर्ग / प्रवर्गाच्या उमेदवारामध्ये ते धारण करीत असलेली उच्च / विशेष शैक्षणिक अर्हता, जाहिरातीतील नमूद प्रशिक्षण व अनुभव विचारात घेता मौखिक परीक्षेसाठी बोलविण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादी मर्यादित केली जाईल. अशी यादी MKCL च्या संकेत स्थळावर (website) प्रसिद्ध केली जाईल याबाबत उमेदवारास कोणताही दावा सांगता येणार नाही.

२२. जाहिरातीत दर्शविलेली संवर्ग व प्रवर्गनिहाय रिक्त पदे ही मा.सहकार खात्याच्या सहकार आयुक्त व निबंधक,सह.संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालयातील व त्यांचे अधिनस्त कार्यालयातील (प्रशासन) पुणे /मुंबई/कोकण/नाशिक/कोल्हापूर/अमरावती /नागपूर / औरंगाबाद / लातूर व (लेखा परिक्षण) पुणे /मुंबई /नाशिक/अमरावती /नागपूर/औरंगाबाद विभागातील आहेत.

२३. रिक्त पंदाच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. तसेच प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचणी उदभवल्यामुळे परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, सामाजिक / समांतर आरक्षण या बाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे अंशतः बदल करणे या बाबतचे सर्व अधिकार मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था , पुणे /मुंबई/कोकण/नाशिक/कोल्हापूर/अमरावती /नागपूर / औरंगाबाद / लातूर व संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन) व पुणे /मुंबई /नाशिक/अमरावती /नागपूर/औरंगाबाद (लेखा परिक्षण) हे स्वतः राखून ठेवत आहेत. या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२४.उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. उमेदवाराची अंतिम निवड झाल्यानंतर जात पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

२५. अर्ज छाननीत प्रशासन विभागाकडील सहकारी अधिकारी श्रेणी-१, सहकारी अधिकारी श्रेणी-२, सहाय्यक सहकारी अधिकारी / वरिष्ठ लिपिक, लिपिक-टंकलेखक या पदांसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची तसेच लेखापरीक्षण विभागाकडील लेखापरीक्षक श्रेणी-१, लेखापरीक्षक श्रेणी-२, उपलेखापरीक्षक व कनिष्ठ लिपिक या पदांसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची **लेखी परीक्षा २०० गुणांची वस्तुनिष्ठ स्वरुपाची (Objective Type)** घेण्यात येईल. सदर परीक्षा ही पदांसाठी आवश्यक असलेली किमान अर्हता, सामान्यज्ञान व पदासाठी आवश्यक असणाऱ्या ज्ञानावर आधारित राहील. कनिष्ठ लिपिक हे पद वगळता इतर पदांसाठी मौखिक परीक्षा २५ गुणांची राहील. निम्नश्रेणी लघुलेखक आणि लघुटंकलेखक या पदांसाठी व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेणे आवश्यक राहील. अशा पदांसाठी १०० गुणांची लेखी परीक्षा, ८० गुणांची व्यावसायिक चाचणी व मुलाखतीसाठी

२० इतके गुण ठेवून उमेदवारांची निवड करुन गुणवत्ताप्राप्त उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल. जे उमेदवार लेखी परीक्षेत उत्तीर्ण होतील अशांनाच ही व्यावसायिक चाचणी देता येईल. वाहनचालक या पदासाठी ९० गुणांची व्यावयायिक चाचणी व मुलाखतीसाठी १० गुण ठेवून उमेदवारांची निवड करुन गुणवत्ताप्राप्त उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल. शिपाई (वर्ग-४) पदांसाठी ७५ गुणांची लेखी परीक्षा व २५ गुणांची मौखिक परीक्षा राहिल. वस्तुनिष्ठ परीक्षा ही महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/ प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.१९/१०/२००७ मध्ये विहित केलेप्रमाणे राहील. उमेदवारांची अंतिम निवड ही लेखी परिक्षेत व मौखिक परीक्षेत प्राप्त गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार केली जाईल.

२६. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर रद्द करण्यात येईल.

२७. लेखी/मौखिक परीक्षा ज्या त्या विभागात घेण्यात येईल.

२८. लेखी/मौखिक परीक्षांना उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

२९. उमेदवारास मराठी भाषा अवगत असणे आवश्यक आहे.

३०.माजी सैनिकांची कनिष्ठ लिपिक पदी नियुक्ती झाल्यास त्यांनी नियुक्तीच्या तारखेपासून ११ महिन्यांचे आत वर नमूद केलेली टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होऊन तसे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३१. पुणे / मुंबई / कोकण / नाशिक / कोल्हापूर / अमरावती / नागपूर / औरंगाबाद / लातूर (प्रशासन) व पुणे / मुंबई / नाशिक /अमरावती / नागपूर/ औरंगाबाद (लेखा परिक्षण) या विभागाकडे नोकरी मिळण्याकरिता या जाहीरातीपुर्वी अर्ज केले असल्यास ते विचारात घेतले जाणार नाहीत.तसेच उमेदवारांनी या जाहीरातींच्या अनुषंगाने विभागाकडे परस्पर अर्ज करु नये.

३२. शासन वित्त विभागाचा दिनांक ३१-१०-२००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवारांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच नविन परिभाषीत अशंदान वेतन योजना लागु राहील.

३३. सहकार खात्यातील उपरोक्त प्रशासन व लेखापरीक्षण विभागाची लेखी परीक्षा स्वतंत्रपणे घेण्यात येणार आहे मात्र उपरोक्त विभागातील पदांची निवड / नियुक्ती त्या त्या विभागापुरती व स्वतंत्र आहे. तसेच राज्यातील इतर विभागांची जाहीरात येण्याची शक्यता आहे याचा विचार करुन उमेदवारांनी अर्ज दाखल करावेत.

३४. उमेदवार लेखी परिक्षेत अधिक गुण मिळवुन देखील मौखिक परिक्षेसाठी गैरहजर राहील्यास त्यांची नियुक्तीची शिफारस करण्यात येणार नाही. (लिपीक - टंकलेखक पद वगळुन ) तसेच सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक २७ जुन ०८ मध्ये नमुद निकषानुसार उमेदवारांना समान गुण मिळाल्यास गुणवत्ता लावली जाईल.

३५. जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या पदासाठी अंतिम निवडीसाठी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना मा. न्यायालयीन आदेश,शासनाचे निर्णय, परिपत्रके,यातील निर्देशाच्या अधिन तसेच वैद्यकीय तपासणी चारित्र्य व पुर्वचारित्र्य इत्यादीच्या अधिन राहुन नियुक्ती दिली जाईल.

सही/-
सदस्य सचिव
संबंधित विभाग व जिल्हा
( प्रशासन व लेखापरीक्षण)